## दिनांक ३१/०७/२०१० रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उधोग मित्र समिती सभेचे इतिवृत

दि ३१/०७/२०१० रोजी मा. श्री. प्रदिप डांगे, उपजिल्हाधिकारी, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाचे सभागृहात जिल्हा उधोग मित्र समिती सभा संपन्न झाली.

सदर सभेत खालील अधिकारी व औधोगीक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र | उपस्थितांचे नांव | कार्यालय |
|---|---|---|
| १ | श्री. आर. ए. गाले | उद्योग सहसचांलक, नागपूर विभाग, नागपूर |
| २ | श्री. अशोक अनेकर | विभागीय अधिकारी, मऔविमं, नागपूर |
| ३ | श्री. एस.वी.अत्रे | जिल्हा अग्रणी बॅंक अधिकारी, बॅंक ऑफ इंडिया, नागपूर |
| ४ | श्री. एस एस आकुलवार | कार्यकारी अभियंता विभाग क्र .१ मऔविम नागपूर. |
| ५ | श्री. डी.एन.भुतडा | अध्यक्ष, कळमेश्वर एमआयडीसी असो. |
| ६ | श्री. जे.सी.साळुंके | कार्यकारी अभियंता विभाग क्र .१ मऔविम नागपूर. |
| ७ | श्री. मयंक एच शुक्ला | उपाध्यक्ष, एमआयए इंड. असो. |
| ८ | श्री. मनीश गुप्ता | सदस्य, बीएमए, बुटीबोरी, एमआयडीसी नागपूर |
| ९ | श्री. अ.ल.सिसोदीया | नगर रचनाकार नागपूर. |
| १० | श्री. डी.के.धामक | उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,२नागपूर |
| ११ | श्री. प्र.ल.बाभुळकर | अप्पर कामगार आयुक्त, नागपूर |
| १२ | श्री. वी गिडवाणी | उपविभागीय अधिकारी, कळमेश्वर, भारत संचार निगम ली. |
| १३ | श्री. जयंत एम. डोके | एमपीसीबी बोर्ड, उद्योग भवन, नागपूर. |
| १४ | श्री. वी.डी. चौरसिया | अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग-३, नागपूर |
| १५ | श्री. जी.एन.नगराळे | कार्यकारी अभियंता , मराविविकं लि. नागपूर |
| १६ | श्री. आय के गिरी | सहा. व्यवस्थापक, मऔविमं, नागपूर |
| १७ | श्री. डी एम. जोगवे | उप अभियंता, एमआयडीसी हिंगणा |
| १८ | श्री. बी.के.राय | उप अभियंता, एमआयडीसी, नागपूर |
| १९ | श्री. आनंद दुरुगकर | प्रतिनिधी |
| २० | श्री. एस.सी.टेंभुर्णे | सहाय्यक, एमएसएफसी, उद्योग भवन, नागपूर |
| २१ | श्री. डी.डी.तिडके | उपसहाय्यक पोलीस, नागपूर |
| २२ | श्री. पी.वी.कुंभारे | जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, नागपूर. |
| २३ | श्री. मोहन देव | समन्वयक, MACCIA |
| २४ | श्री. जी.एस.उमप | सदस्य सचिव व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर |

## दिनांक ३१/०७/२०१० रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उधोग मित्र समिती सभेचे इतिवृत

| अ क | संघटनेचे नांव | बैठकीतील विषय | दि ३१/०७/२०१० रोजी झालेल्या जिल्हा उधोग मित्र समितीतील निर्णय | कार्यवाही यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | अ | मागील सभेच्या कार्यवृत्तास मंजुरी | मागील दि २५/०६/२०१० रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्तास मंजुरी देण्यात आली. | |
| | ब | **जुने विषय** | | |
| १ | बीएमए नागपूर | तिस-या आय. टी. पार्क प्रगती बाबत :- | मे. मंत्री ग्रुप यांनी सादर केलेल्या मास्टर प्लॅनला मऔविम मुख्यालय, मुंबई यांनी मंजुरी प्रदान केली असून Demarcation Plan सादर करण्याबाबत त्यांना कळविण्यात आले आहे. | मे. मंत्री ग्रुप /मऔविमं |
| २ | बीएमए नागपूर | एमआयडीसी बुटीबोरी मध्ये विहीत कालावधीत उद्योग सुरु न औद्योगिक वापरासाठी वाटप करण्यात आलेले भुखंड / जागा रद्द करण्याबाबत. | सद्यस्थितीत वाटप करण्यात आलेल्यापैकी ३५० भुखंडावर उद्योग सुरु करण्याची कोणतीही कार्यवाही उद्योजकांतर्फे करण्यात आलेली नाही असे विभागीय अधिकारी मऔविमंने सांगितले. वाटपाकरीता ६१ रिकामे भुंखंड उपलब्ध असुन त्याची एकुण जागा ५८ हेक्टर असल्याचे सांगितले. त्यापैकी ३० एकरचे जवळपास जागा भविष्यात येणा-या मोठया किंवा विशाल उद्योगांसाठी राखीव ठेवून उर्वरीत जागेत छोटया भुखंडाचे नियोजन करण्यात यावे असे उद्योग सहसंचालक यांनी सुचित केले. तसेच टेक्सटाईल्स पार्क मधील जागा वेगवेगळया प्रकारच्या प्रदुषण न करणा-या उद्योगांना दयावी असे त्यांनी सुचविले. या संदर्भात उद्योग सहसंचालक, प्रादेशिक अधिकारी, मऔविमं यांनी एकत्र बसुन पुढील कार्यवाही ठरवावी असे अध्यक्षांनी सुचित केले. | उद्योग सहसंचालक /विभागीय अधिकारी, मऔविम नागपूर |
| ३ | हळदगांव परीसरातील स्टोन क्रशिंग घटक | हळदगांव खदान ते मेनरोड, वर्धा हा खनिज निधीतून रस्ता तयार करण्याबाबत. | हळदगांव खदान ते मेनरोड वर्धा हा रस्ता आधीपासुनच अस्तित्वात असल्याचे तहसिलदारांचा अहवाल असल्याचे खनिकर्म अधिकारी-यांनी सभेत सांगितले. यावर खनिकर्म अधिकारी सांगत असलेला रस्ता वेगळा असुन आवश्यकता असलेला रस्ता वेगळया ठिकाणचा असल्याचे संघटनेचे प्रतिनीधी श्री. दुरुगकर यांनी सांगितले. यावर खनिकर्म अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग अधिका-यांनी संयुक्त तपासणी करावी असे मा. अध्यक्षांनी सुचित केले. प्रकरणात बराच विलंब झाल्यामुळे एक विशेष वेगळी सभा बोलावून आढावा घ्यावा असे ठरले. | खनिकर्म कार्यालय व सार्वजनिक बांधकाम विभाग (राज्य ) |
| ४ | एमआयए | एमआयडीसी हिंगणा येथील दुरध्वनीबाबत | दुरध्वनी विभागाचे संबधित प्रतिनिधी हजर नसल्यामुळे सद्यस्थितीबाबत माहिती समजु शकली नाही. परंतु अजुनही दुरध्वनी सेवा सुधारली नसल्याचे औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधींनी सभेत सांगितले. यावर केबल टाकण्याकरीता व दुरध्वनी सेवा सुरळीत | भारत संचार निगम लिमीटेड, नागपूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | होण्याकरीता केलेल्या नियोजनासंदर्भात माहिती घेण्याकरीता संबधित विभागाशी एक वेगळी सभा घेण्यात यावी, असे अध्यक्षांनी सुचविले. | |
| ५ | एमआयडीसी कळमेश्वर | दुरध्वनी सेवेबाबत | कळमेश्वर येथील टेलीफोन विभागाचे एक्सचेंज सुरळीत सुरु असुन मधल्या काळात एक्सचेंजमध्ये झालेला बिघाड पुर्णपणे दुरुस्त करण्यात आल्याचे दुरध्वनी विभागाच्या प्रतिनीधींनी सभेत सांगितले. एखादया उद्योगांच्या दुरध्वनी संबधीत काही तक्रार असल्यास ती त्वरीत दुर करण्यात येईल असे त्यांनी सभेत सांगितले. (विषय बंद) | |
| ६ | मऔविम | बुटीबोरी एमआयडीसी क्षेत्रातील अवैध उत्खननाबाबत. | एमआयडीसी क्षेत्रातील अवैध उत्खनन सद्यस्थितीत बंद झाले असल्याचे कार्यकारी अभियंता, मऔविमं यांनी सभेत सांगितले. परंतु एमआयडीसी क्षेत्राबाहेर उत्खनन अजुनही चालु असते व ते पुन्हा अवैध उत्खनन मऔविमं क्षेत्रात करु शकतात असे औद्योगिक सघटनांनी सांगितले. यावर खनिकर्म अधिका-यांनी योग्य ती कार्यवाही करुन संबधितांवर FIR नोंदवावे असे अध्यक्षांनी निर्देश दिले. | खनिकर्म अधिकारी/ तहसिलदार हिंगणा, तहसिलदार नागपूर ग्रामीण व मऔविमं |
| ७ | एमआयडीसी कळमेश्वर | कळमेश्वर बायपास रोड सुरु होण्याबाबत | कळमेश्वर बायपास रोड सार्वजनिक रहदारीकरीता सुरु झाला असला तरी तेथील डांबरीकरणाचे काम फार संथगतीने सुरु असल्याचे औद्योगिक संघटनेच्या प्रतिनीधींनी सभेत सांगितले. यावर पहिल्या स्टेजचे काम पुर्ण झाले असुन पुढच्या स्टेजचे कामाकरीता मंजुरी अजुन मिळायची असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रतिनीधींनी सभेत सांगितले. खडडे पडलेल्या रस्त्याचा भाग पावसाळयामुळे योग्य त-हेने दुरुस्त होत नसल्याचे त्यांनी सभेत सांगितले. | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| ८ | एमआयए | E.S.I.S हॉस्पीटलच्या दुरावस्थेबाबत. | E.S.I.S च्या अधिका-यांची एक स्वतंत्र वेगही सभा मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात येवून त्याबाबत कार्यवृत्त व कार्यवाही सर्व संबधितांना कळविली असल्याचे महाव्यवस्थापक यांनी सभेत सांगितले. (विषय बंद) | |
| ९ | **बीएमए** | बुटीबोरी एमआयडीसी टी पांईट जवळच्या रस्त्यावरील रहदारीच्या असुविधेबाबत. | नॅशनल हायवे विभागाशी एमआयडीसीची याबाबतीत चर्चा झाली करण्यांत आली असुन पोलीस स्टेशन, बुटीबोरी, BMA, CIDCO यांना नाहरकत प्रमाणपत्र देण्याबाबत कळविण्यात आले आहे. या सर्व विभागांचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर प्रस्ताव नॅशनल हायवे यांना सादर करावयाचा आहे, असे मऔविमंचे प्रतिनीधीनी सभेत सांगितले. | मऔविम, नॅशनल हायवे् व औद्योगिक संघटना |
| १० | **बीएमए** | बुटीबोरी मऔविमं क्षेत्रात विजेच्या दुरुस्तीसाठी शिडी असलेल्या वाहनाच्या गरजेबाबत. | बुटीबोरी मऔविम क्षेत्रात वेळोवेळी विद्युत संबधी दुरुस्तीकरीता शिडी असलेल्या वाहनाची गरज भासते. मराविविकं तर्फे ते देण्यात आल्यास फार सुविधा होईल अशी आद्योगिक संघटनेने मागणी केली. या संदर्भात असे वाहन किरायाने घेण्या संदर्भात प्रस्ताव मंजुरीकरीता मुख्य अभियंता मराविविकं यांचेकडे पाठविण्यात आला होता त्यास मंजुरी मिळाली असुन पुढील कार्यवाही त्वरीत करण्यात येईल, असे मराविविकंच्या प्रतिनिधींनी सभेत सांगितले. | मराविविकं |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | **व्हीआयए व एमआयए** | मऔविमं हिंगणा क्षेत्रात होणा-या प्रदुषित पाणी पुरवठयाबाबत. | महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने पाणी देण्यास सहमती कळविल्याप्रमाणे प्रस्ताव मुख्यालयास सादर करण्यांत आला होता. सदर प्रस्तावावर मुख्यालयाने दर आकारणीबाबत संबधित औद्योगिक संघटने सोबत चर्चा करण्यांत यावी असे कळविले. त्या अनुषंगाने श्री. चंदर खोसला, अध्यक्ष, एमआयए इंडस्ट्रिज असो., यांचे सोबत दिनांक १९/०५/२०१० रोजी चर्चा करण्यांत आली. सदर चर्चेच्या अनुषंगाने प्रस्ताव मुख्यालयास सादर करण्यांत येत आहे. औद्योगिक क्षेत्रामध्ये शुध्द पाण्याची जलवितरीका बदलवून नविन जलवितरीका टाकण्याच्या कामाला मुख्यालयातून मंजुरी मिळाली असून लवकरच कंत्राटदारास सदर कामाचे आदेश देण्यांत येतील. | मऔविमम‌ं |
| १२ | **बीएमए** | मे. आर्चिड सर्जिकल बुटीबोरी यांना विद्युत पुरविण्याबाबत. | मे. आर्चिड सर्जिकल ए १३/२३, बुटीबोरी, एमआयडीसी या उद्योगाची प्रकल्प किंमत फक्त रु.२५ लाख असून त्यांना विद्युत जोडणीकरीता मराविविकं तर्फे रु.४.५० लाखाची मागणी करण्यात आली असे सभेत सांगण्यात आले. उद्योजकाने अजुन रकमेचा भरणा केला नसल्याचे मराविविकं च्या अधिका-यांनी सभेत सांगितले. यावर विद्युत जोडणी किंमत कमी करुन देण्याच्या शक्यतांचा विचार करण्यात यावा असे अध्यक्षांनी सुचविले. | मराविविकं |
| | | नविन विषय | | |
| १३ | | सुक्ष्म व लघु उपक्रम सुकरता परीषदेच्या कामाबाबत | सुक्ष्म व लघुउद्योगांना इतर उद्योगांकडुन येणे असलेल्या प्रलंबित रकमेवर व्याज मिळण्याबाबतची तरतुद सुक्ष्म व लघु उपक्रम सुकरता परीषदेच्या माध्यमाने MSMED ACT-२००६ अंतर्गत करण्यात आल्याचे सदस्य सचिवांनी सभेत सांगितले व संघटनांची त्यांचे सदस्यांना त्याबाबत अवगत करण्याबाबत विनंती केली. सदर बाब उद्योग सहसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांचे मार्फत हाताळण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. | |

सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यांत आले.

मा. उपजिल्हाधिकारी
नागपूर

महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र,नागपूर.

**जिल्हास्तरीय आजारी उद्योग समिती सभेचे कार्यवृत्त दि.३१/०७/२०१०**

दि ३१/०७/२०१० रोजी मा. श्री. प्रदिप डांगे, उपजिल्हाधिकारी, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाचे सभागृहात आजारी उद्योग समिती सभा संपन्न झाली.

सदर सभेत खालील अधिकारी व औधोगीक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र | उपस्थितांचे नांव | कार्यालय |
|---|---|---|
| १ | श्री. आर. ए. गाले | उद्योग सहसचांलक, नागपूर विभाग, नागपूर |
| २ | श्री. अशोक अनेकर | विभागीय अधिकारी, मऔविमं, नागपूर |
| ३ | श्री. एस.वी.अत्रे | जिल्हा अग्रणी बँक अधिकारी, बँक ऑफ इंडिया, नागपूर |
| ४ | श्री. एस एस आकुलवार | कार्यकारी अभियंता विभाग क्र .१ मऔविम नागपूर. |
| ५ | श्री. डी.एन.भुतडा | अध्यक्ष, कळमेश्वर एमआयडीसी असो. |
| ६ | श्री. जे.सी.साळुंके | कार्यकारी अभियंता विभाग क्र .१ मऔविम नागपूर. |
| ७ | श्री. मयंक एच शुक्ला | उपाध्यक्ष, एमआयए इंड. असो. |
| ८ | श्री. मनीश गुप्ता | सदस्य, बीएमए, बुटीबोरी, एमआयडीसी नागपूर |
| ९ | श्री. अ.ल.सिसोदीया | नगर रचनाकार नागपूर. |
| १० | श्री. डी.के.धामक | उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,२नागपूर |
| ११ | श्री. प्र.ल.बाभुळकर | अप्पर कामगार आयुक्त, नागपूर |
| १२ | श्री. वी गिडवाणी | उपविभागीय अधिकारी, कळमेश्वर, भारत संचार निगम ली. |
| १३ | श्री. जयंत एम. डोके | एमपीसीबी बोर्ड, उद्योग भवन, नागपूर. |
| १४ | श्री. वी.डी. चौरसिया | अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग-३, नागपूर |
| १५ | श्री. जी.एन.नगराळे | कार्यकारी अभियंता , मराविविकं लि. नागपूर |
| १६ | श्री. आय के गिरी | सहा. व्यवस्थापक, मऔविमं, नागपूर |
| १७ | श्री. डी एम. जोगवे | उप अभियंता, एमआयडीसी हिंगणा |
| १८ | श्री. बी.के.राय | उप अभियंता, एमआयडीसी, नागपूर |
| १९ | श्री. आनंद दुरुगकर | प्रतिनिधी |
| २० | श्री. एस.सी.टेंभुर्णे | सहाय्यक, एमएसएफसी, उद्योग भवन, नागपूर |
| २१ | श्री. डी.डी.तिडके | उपसहाय्यक पोलीस, नागपूर |
| २२ | श्री. पी.वी.कुंभारे | जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, नागपूर. |
| २३ | श्री. मोहन देव | समन्वयक, MACCIA |
| २४ | श्री. जी.एस.उमप | सदस्य सचिव व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर |

आजारी उद्योग समिती सभेपुढे नविन विषय नव्हते. सदस्यांचे चर्चेत सरफ्रेसी ACT अंतर्गत बँका जिल्हाधिका-यांची परवानगी न घेता आजारी उद्योगांची मालमत्ता ताब्यात घेतात असे श्री. मोहन देव यांनी सभेत सांगितले. यावर अशा कमीत कमी १० प्रकरणांबाबत माहिती पुरविण्यात यावी. जेणेकरुन या प्रकारच्या प्रकरणांत कार्यवाहीबाबत विचार करता येईल, असे उद्योग सहसंचालक, यांनी सभेत सांगितले.

सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

मा. उपजिल्हाधिकारी
नागपूर

महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र,नागपूर.